बोदवड एज्युकेशन सोसायटी बोदवड

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड ता. बोदवड जि. जळगाव

## विद्यार्थी विकास कक्ष

कवाविमबो / विविक - 09 / 2024-25

दिनांक – 21.09.2024

### सूचना क्र. 09 / 2024/82

## महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील विद्यार्थी विकास विभाग आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड मधील विद्यार्थी विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानात आपल्या विद्यार्थी विकास कक्षाद्वारे खालील प्रमाणे कार्यक्रम राबविले जातील.

1. विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळी व त्यांच्या समस्या याविषयी जागृतीबाबत तज्ञ महिला डॉक्टरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात येईल.
2. अभियानात सहभागी विद्यार्थिनींचे रक्तगट / हिमोग्लोबिन / सीबीसी तपासणी शिबिराचे आयोजन केले जाईल.
3. विद्यार्थिनींसाठी स्वच्छतेबाबतची कार्यशाळा आयोजित केले जाईल.
4. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी किंवा संबंधितांना सल्ला देण्यासाठी तज्ञ महिला डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित केले जाईल.
5. महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती संदर्भात घोषवाक्य स्पर्धा आयोजित केली जाईल.
6. महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती संदर्भात निबंध स्पर्धा आयोजित केली जाईल.
7. महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती संदर्भात वक्तृत्व स्पर्धा आयोजित केले जाईल.

उपरोक्त तीनही स्पर्धांसाठी अनुक्रमे 201, 101 आणि 51 रुपयाची रोख बक्षिसे दिले जातील, सोबतच विद्यापीठ आणि महाविद्यालयाकडून प्रत्येकी एक प्रमाणपत्र सुद्धा सहभागी विद्यार्थिनींना दिले जाईल. या अभियानामध्ये महाविद्यालयातील **फक्त 60** विद्यार्थिनी अपेक्षित आहेत. तरी लवकरात लवकर दिनांक 25 सप्टेंबर 2024 पर्यंत विद्यार्थिनींनी आपली नाव नोंदणी विद्यार्थी विकास अधिकारी, डॉ. अजय पाटील यांच्याकडे करावी. नंतर आलेल्या विद्यार्थिनींचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत

डॉ. अजय पाटील
विद्यार्थी विकास अधिकारी

प्राध्यापक अरविंद चौधरी
प्राचार्य